ePaper

| वर्ष - 6 । अंक - 293 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार , दि. 8फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मुंबई केंद्रशासित प्रदेश होणार, महाराष्ट्राचे तुकडे पडणार : एकनाथ शिंदे



### आतील पानांत


- गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा'तील 'चिल्लर' गोंधळ चिंचवडलाही
- दिलीप भोईर यांचा शेकापला अखेरचा लाल सलाम
- जुनी पेन्शन योजना 'या' पाच राज्यांत


# महाविकास आघाडीत बंडाळी!

## » राहुल कलाटे यांचा एल्गार : अधिकृत उमेदवारी नाना काटेंकडे





। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. दुसरीकडे, प्रमुख दावेदार राहुल कलाटे यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच, अधिकृत उमेदवारी अर्ज नाना काटे यांनी भरला आहे. त्यामुळे ही निवडणूक त्रिशंकू होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**

देगलूर, पंढरपूर, कोल्हापूरच्या पोटनिवडणुका बिनविरोध झाल्या नाहीत. पण, त्यानंतरच्या पोटनिवडणुका बिनविरोध करण्यासाठी भाजपाने आटोकाट प्रयत्न केला. मात्र, राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार निवडणूक लढवण्यावर ठाम राहिले आहेत.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या "घड्याळ" चिन्हावर महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांनी रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पदयात्रा काढली. त्यानंतर शक्तीप्रदर्शन करीत ग प्रभाग कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार, आमदार सुनील शेळके, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे आदी उपस्थित होते. दरम्यान, महाविकास आघाडीचा घटकपक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून राहुल कलाटे यांनी उमेदवारीवर दावा केला होता. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांतील खलबतानंतर कलाटे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले नाही. अखेर राहुल कलाटे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयापासून शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज भरण्यात आला.

### पोटनिवडणूक अवघड नाही – अजित पवार



» भाजपने पोटनिवडणुका लढविल्याने आम्ही कसबा आणि चिंचवडची पोटनिवडणूक लढविण्याचा महाविकास आघाडीने निर्णय घेतला. चिंचवडमध्ये राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. त्याला मेहनतीची जोड दिल्यास पोटनिवडणूक जिंकणे अवघड नसल्याचे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार म्हणाले. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांशी चर्चा करुन नाना काटे यांना उमेदवारी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसने शहराचा कायापालट केला. त्यामुळे विकास कामांच्या जोरावर निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. मेहनत घेतल्यास पोटनिवडणूक अवघड नाही. एकदा माणूस पाच लाख मतांनी निवडणूक आला. तर, त्याला पुढच्या वेळेसही पाच लाख मते मिळत नाहीत. मते बांधिल नसतात. तसेच माझे उद्धव ठाकरे यांच्याशी बोलणे झाले आहे. (CHINCHWAD BYE-ELECTION) त्यांनी महाविकास आघाडीचा उमेदवार नाना काटे यांनाच पाठिंबा असल्याचे सांगितल्याचे त्यांनी राहुल कलाटे यांच्याबाबतच्या प्रश्नावर बोलताना सांगितले.

### लढत तिरंगी होण्याची शक्यता

» चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या अश्विनी जगताप, महाविकास आघाडीचे नाना काटे व अपक्ष राहुल कलाटे हे प्रमुख दावेदार रिंगणात आहेत. तर, अपक्ष कलाटे यांचा अर्ज कायम राहिल्यास लढत तिरंगी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### आमदार सुनील शेळकेंकडून मनधरणी...

» महाविकास आघाडीच्या मतांची विभागणी होवू नये. याकरिता आमदार सुनील शेळके आणि शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कलाटे यांनी माघार घेण्यास नकार दिला.



“ २००९ पासून चिंचवड विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेस चालत नाही. त्यामुळेच लक्ष्मण जगताप यांनी अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला होता. मी सुद्धा मागील वेळेस अपक्ष निवडणूक लढविली होती. अजितदादांना आजपर्यंत पिंपरी चिंचवड शहर कळले नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोणीही लढायला तयार नव्हते. लोकसभेची लाट आल्यानंतर हे सगळे उमेदवार, जे आता तथाकथित पुढे आले ते सगळे घरी गेले होते. ज्यावेळेस मी निवडणूक लढायची ठरवली, तेव्हा बाकीच्या पक्षांनी आणि संघटनांनी मला त्यावेळी साथ दिली होती.

- राहुल कलाटे, **अपक्ष उमेदवार.**

“ पोटनिवडणुकीत चिंचवड जागेसाठी आणि उमेदवार कोण यासाठी मी शेवटपर्यंत चर्चा केली. वेगवेगळे पर्याय दिले पण एकमत झाले नाही. सकाळी सर्वांशी बोललो. त्यानंतर नाना काटे यांच्या नावावर एकमत झाले. ते जाहीर केले. राहुल कलाटे उभे राहणार असले तरी आमचा अजूनही एकमत करण्याचा प्रयत्न आहे. सहानुभूतीचा विषय नाही. तीन निवडणुकामध्ये यांना सहानुभूती दिसली नाही. फक्त मुंबईमध्ये त्यांनी उमेदवार दिला नाही. त्यामुळे ही निवडणूक लढवावी हे सर्वांचे मत होते. यामध्ये उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेचा पाठिंबा राहील असे सांगितले आहे. !

- अजित पवार, विरोधी पक्षनेते.

**चिंचवड पोटनिवडणूक: गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा' चित्रपटातील प्रसंगाची आठवण**

# 'चिल्लर' गोंधळ!

## उमेदवाराची अनामत रक्कम म्हणून दहा हजारांची चिल्लर; कर्मचाऱ्यांची दमछाक



**।पुणे । महाईन्यूज ।। प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी एका अपक्ष तरुण उमेदवाराने चक्क दहा हजार रुपयांची चिल्लर उमेदवारी शुल्क तथा अनामत म्हणून जमा केली. ती चिल्लर मोजता मोजता निवडणूक कर्मचाऱ्यांची आज दमछाक झाली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी वेळ संपत आली असताना हा उमेदवार चक्क साडेतेरा हजार रुपयांची चिल्लर घेऊन आला. त्यावेळी कार्यालयात मोठा गोंधळ उडाला. या घटनेने 'दिल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा' या धमाल मराठी विनोदी चित्रपटाची आठवण झाली.**

'दिल्लीत गोंधळ....' सिनेमाचा नायक मकरंद अनासपुरे यानेही निवडणूक लढविण्यासाठीच्या अनामत रकमेची संपूर्ण चिल्लर आणून निवडणूक कर्मचाऱ्यांची दमछाक केली होती. त्यातून घडलेले विनोद पाहून प्रेक्षकांची हसून पुरेवाट झाली होती. त्याचीच पुनरावृत्ती आज चिंचवडला झाली. राजू काळे (वय २८, रा. पिंपळे निलख, पिंपरी-चिंचवड) असे या अवलिया तरुण उमेदवाराचे नाव आहे. तो एमएचे शिक्षण घेत आहे.

राजू काळे (RAJI KALE) यांनी जमा केलेल्या उमेदवारी शुल्काच्या दहा हजार रुपयांची चिल्लर मोजायला निवडणूक कर्मचाऱ्यांना एक तास लागला. त्यात एक, पाच आणि दहा रुपयांची नाणी होती. तर, त्याच्या उमेदवारी अर्जाची प्रक्रिया पूर्ण करताना त्यांचे दोन तास गेले.

साडेबारा वाजता निवडणूक कार्यालयात गेलेला हा तरुण अर्ज भरण्याची मुदत संपायला थोडाच वेळ राहिला होता. तो दोन तासानंतर तेथून बाहेर पडला. तरीही त्याच्याकडे साडेतीन हजार रुपयांची चिल्लर शिल्लक होती. म्हणजे त्याच्याकडे असलेली साडेतेरा हजार रुपयांची एकूण चिल्लर घेऊन तो आला होता.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राजू काळे यांनी संवाद साधला. ते म्हणाले, "बारावीत असल्यापासून ही चिल्लर जमवीत होतो. ती चिल्लर बँकही स्वीकारत नव्हती. तेवढ्यात ही पोटनिवडणूक लागली, आणि मी या चिल्लरचा उपयोग इथं करायचं ठरवलं."

रयत विद्यार्थी परिषदेचे काम केलेल्या राजू यांनी आपले डिपॉझीट जप्त होणार नसल्याचा दावा केला. उलट निर्णायकी मते घेऊ, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राजू काळे म्हणाले, "विद्यार्थी म्हणून वाढलेल्या भ्रष्टाचाराचा प्रश्न पडतो. तसेच राजकारण व निवडणूक वाईट असते, असे बोलले जाते. म्हणून त्याचा अनुभव घेण्यासाठी ही निवडणूक लढणार असून माघार घेणार नाही," असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

### डिपॉझीट जप्त होणार नसल्याचा दावा

**उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राजू काळे यांनी संवाद साधला. ते म्हणाले, "बारावीत असल्यापासून ही चिल्लर जमवीत होतो. ती चिल्लर बँकही स्वीकारत नव्हती. तेवढ्यात ही पोटनिवडणूक लागली, आणि मी या चिल्लरचा उपयोग इथं करायचं ठरवलं." रयत विद्यार्थी परिषदेचे काम केलेल्या राजू यांनी आपले डिपॉझीट जप्त होणार नसल्याचा दावा केला. उलट निर्णायकी मते घेऊ, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राजू काळे म्हणाले, "विद्यार्थी म्हणून वाढलेल्या भ्रष्टाचाराचा प्रश्न पडतो. तसेच राजकारण व निवडणूक वाईट असते, असे बोलले जाते. म्हणून त्याचा अनुभव घेण्यासाठी ही निवडणूक लढणार असून माघार घेणार नाही," असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार अरविंद शिंदे यांना 47, 297 मतं पडली होती. यावेळी मुक्ता टिळक यांच्यात फक्त 28, 196 मताचा फरक होता. त्याचबरोबर 2014 च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार रोहित टिळक यांना 31, 332 मत तर मनसेकडून उभे राहिलेले रविंद्र धंगेकर यांना 25, 998 मत पडली होती.**

# वीजदरवाढ केल्यास उद्योजकांचा आंदोलनाचा इशारा

## पुन्हा दरवाढ लादल्यास महाराष्ट्रातील उद्योग व्यवसायिकांचे आर्थिक गणित कोलमडणार

**।बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



महावितरणने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे जवळपास 37 टक्के इतकी प्रचंड वीजदरवाढ करण्यासाठी परवानगी मागितली आहे. मुळातच महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत वीजदर अधिक असून पुन्हा दरवाढ लादल्यास महाराष्ट्रातील उद्योग व्यवसायिकांचे आर्थिक गणित कोलमडणार आहे.

त्यामुळे प्रस्तावित वीज दरवाढ लादल्यास महाराष्ट्रातील उद्योजक आंदोलन करतील, असा इशारा बारामती इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी दिला आहे. वीज दरवाढीविरोधात महावितरण बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील पावडे यांना निवेदन देण्यात आले त्याप्रसंगी ते बोलत होते.

असोसिएशनचे उपाध्यक्ष शरद सुर्यवंशी, सचिव अनंत अवचट, सदस्य महादेव गायकवाड, मनोज पोतेकर, मनोहर गावडे, अंबिरशाह शेख, संभाजी माने, उद्योजक विजय झांबरे, संदीप जगताप, अनिल काळे, शार्दुल सोनार, सुनील वैद्य, उज्वल शहा, सुनील पवार, हेमंत हेंद्रे, नितीन जामदार, सुजय पवार, विजय जाधव, सुशिल घाडगे, विनोद मोरे, रघुपती, रत्नाप्पा जैन आदी उद्योजक तसेच महावितरणचे उपकार्यकारी अभियंता प्रकाश देवकाते उपस्थित होते.

धनंजय जामदार पुढे म्हणाले, राज्या राज्यातील उद्योगांमधील तीव्र स्पर्धा असताना महाराष्ट्रातील वीजदर कळीचा मुद्दा ठरत आहे. अशातच पुन्हा वीज दरवाढ केली तर महाराष्ट्रातील उद्योग व्यवसायिक स्पर्धेतून बाहेर फेकले जातील याची चिंता वाटत आहे. आत्ताच बारामती सह राज्यातील अनेक मोठे प्रकल्प अवाजवी वीज दरामुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. कित्येक लहान मोठे उद्योग परराज्यात स्थलांतर करण्याच्या विचारात आहेत.

महावितरणने वीज गळती, वीज चोरी रोखणे, कर्मचाऱ्यांचे प्रभावी व्यवस्थापन, काटकसर गरजेची आहे. वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवणे, खाजगी वीज प्रकल्पातून कमी दराने वीज खरेदी, सौर ऊर्जा व पवन ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

# तब्बल 40 उमेदवार रिंगणात

## » उद्या अर्जांची छाननी : चिल्लर मोजताना कर्मचाऱ्यांची धांदल

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी एकूण चाळीस उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे मंगळवारी (ता. ७) तब्बल २६ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. आता अर्ज छाननी आणि अर्ज माघारीनंतर किती जणांनी उमेदवारी राहणार याकडे लक्ष लागले आहे.**



चिंचवडचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे ही निवडणूक होत आहे. गेल्या महिन्यात ३ तारखेला त्यांचे निधन झाल्यानंतर लगेचच १५ दिवसांत ही निवडणूक जाहीर करण्यात आली. त्यामुळे सर्वांनाच धक्का बसला होता. ३१ जानेवारीपासून त्यासाठी अर्ज दाखल करण्यास सुरवात झाली.

अखेरच्या दिवशी म्हणजे मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस, संभाजी ब्रिगेड, आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे) बंडखोर आणि अपक्ष अशा २६ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

त्यापूर्वीच्या सहा दिवसांत फक्त १४ जणांनी ते भरून दिले होते. दरम्यान एका अपक्ष उमेदवाराने अनामत रक्कम म्हणून दहा हजारांची चिल्लर जमा केली. ती मोजताना निवडणूक कार्यालयातील कर्मचाऱ्यांची धांदल उडाली होती.

### उद्या दाखल अर्जांची छाननी...

» उद्या दि.९ रोजी दाखल अर्जांची छाननी होईल. त्यात वैध ठरलेल्या उमेदवारांना १० तारखेपर्यंत आपली उमेदवारी मागे घेता येणार आहे. त्यानंतर एक, दोन की तीन व्होटिंग मशिन लागतात, याचा उलगडा होणार आहे. तसेच लढतीचेही चित्र स्पष्ट होईल. तूर्तास चिंचवडची लढत ही तिरंगी होईल, अशीच चिन्हे आहेत. २६ तारखेला मतदान असून २ मार्चला निकाल लागणार आहे.

### अश्विनी जगताप यांची 32 कोटींची मालमत्ता...

» पिंपरी चिंचवडचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनी अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्या व त्यांचे पती हे ही कोट्यधीश आहेत. तरीही त्या दोघांकडेही स्वत:ची मोटार नाही. अश्विनी जगताप या दहावी उत्तीर्ण आहेत.

» त्यांची शेती आणि व्यवसाय आहे. दोघांचीही एकूण ३२ कोटी रुपयांची संपत्ती आहे. यात अश्विनी जगताप यांची स्वत:ची एकूण मालमत्ता १३ कोटी रुपयांची मालमत्ता आहे. तर पतीची १८ कोटींची संपत्ती आहे. मात्र, अश्विनी यांची जंगम मालमत्ता (११ कोटी) ही पतीच्या जंगम मालमत्तेपेक्षा (साडेपाच कोटी) जास्त आहे.



# शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी एकसमान रचना!

## » महापालिका प्रशासनाचा पुढाकार : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची माहिती

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पीसीएमसी स्कूल पॅटर्ननुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शाळांची एकसमान रचना करण्यात येणार आहे. त्या कामांची निविदा स्थापत्य विभागाने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. हे काम झाल्यानंतर पालिकेच्या शाळा एकसारख्या दिसणार आहेत.**




पालिकेच्या ११० प्राथमिक शाळा, १८ माध्यमिक शाळा आणि १ संतपीठ विद्यालय असे एकूण १२९ शाळा आहेत. त्यात सुमारे ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या सर्व शाळांची रचना व रंगसंगती वेगवेगळी आहे. या शाळांपैकी ३८ शाळांची मॉडेल स्कूल म्हणून निवड करण्यात आली आहे.

पीसीएमसी स्कूल या पॅटर्नअंतर्गत या ३८ शाळांची रचना एकसमान करण्यात येणार आहे. त्या सर्व शाळा इमारती एका रंगसंगतीमध्ये रंगविल्या जाणार आहे. प्रवेशद्वार, नामफलक, शाळाचे बोधचिन्ह, वर्ग खोल्या व स्वच्छतागृहाची दुरूस्ती करून सुशोभीकण केले जाणार आहे. तुटलेल्या फरश्या दुरूस्त केल्या जाणार आहेत. त्यामुळे पालिकेच्या शाळांची वेगळी ओळख निर्माण होऊन नागरिकांना ती लगेच ओळखता येणार आहे. त्या कामासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे, असे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

महापालिकेच्या आस्थापनेवरील गणवेश देय कर्मचाऱ्यांना गणवेशाची रोख रक्कम देण्याबाबतचा निर्णय समितीमार्फत घेण्याकामी तसेच धोरण ठरवण्यासाठी महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबधित अधिकाऱ्यांची एकत्रित समिती गठीत करण्यात आली आहे. दरम्यानच्या कालावधीत काही विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच महानगरपालिका महासंघाची गणवेशामध्ये बदल करण्याबाबतची मागणी कामगार कल्याण विभागाकडे प्राप्त झाली होती.



**“ महापालिका शाळेत अनेक गुणवंत व हुशार विद्यार्थी आहेत. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना भारत दर्शन घडविले जाणार आहे. अवकाश संशोधन केंद्र आणि बंगळूरू, देशाची राजधानी दिल्ली अशा ठिकाणी शैक्षणिक सहल काढली जाणार आहे. या उपक्रमात राष्ट्रीय व राज्य क्रीडा स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचाही समावेश करण्याचा विचार आहे.**

**- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

## संपादकीय »

# नाशिक-पुणे हायस्पीड मार्गाला गती मिळण्याची आशा!

*नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग नाशिक, अहमदनगर आणि पुणे अशा तीन जिल्ह्यांना जोडत एकात्मिक विकासाला चालना देणार आहे. या तीन जिल्ह्यातील आतापर्यंत रेल्वे कनेक्टिव्हिटीने वंचित गावांच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा तर आहेच. परंतु मुंबई-पुणे-नाशिक हा विकासाचा सुवर्ण त्रिकोण साधण्यासाठी देखील हा प्रकल्प अत्यंत मोलाची भूमिका बजावणार आहे.*

सध्याच्या घडीला तरी नाशिक-पुणे महामार्गाला कुठलाही पर्याय उपलब्ध नाही. या महामार्गावरून प्रवासी अथवा मालवाहतूक करताना वाहनचालक तसेच प्रवाशांना नेहमीच त्रासाला सामोरे जावे लागते. मागील काही वर्षांमध्ये महामार्गावरील वर्दळ प्रचंड वाढली आहे. परिणामी येथे नेहमीच वाहतूककोंडीची समस्या सतावत असते. निकृष्ट कामामुळे रस्त्यावर जागोजागी पडलेले खड्डे, कधी अपघात तर कधी पाउसपाण्यामुळे येथील वाहतूक बहुतांश वेळेला संथगतीनेच धावत असते. यांत प्रवाशांचा बहुमूल्य वेळ आणि इंधन दोन्हींचा प्रचंड अपव्यय होतो. तर दुसरीकडे नाशिक – पुणे असा थेट रेल्वे मार्ग नसल्याने पुणे किंवा नाशिक गाठण्यासाठी मुंबईला येऊन रेल्वे पकडावी लागते. या दोन्ही प्रवासासाठी किमान ६ तासापेक्षा जास्त वेळ लागतो. हा प्रवासाचा वेळ कमी करण्यासोबतच नाशिक-पुणे हे दोन्ही महत्त्वाची शहरे मुंबईला वळसा न घालताच रेल्वे कनेक्टिव्हिटीने थेट एकमेकांशी जोडण्यासाठी नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेची संकल्पना मूळ धरू लागली. नाशिक आणि पुण्यातील काही लोकप्रतिनिधींनी २००४ पासून नाशिक-पुणे हायस्पीड प्रकल्पाच्या मंजुरीसाठी कसोशीने प्रयत्न केले. यामध्ये माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तसेच डॉ. अमोल कोल्हे या लोकप्रतिनिधींचाही समावेश आहे. या दरम्यान बहुतांश अधिवेशात रेल्वेमार्गासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यास २०१६ मध्ये यश येऊन तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी रेल्वे अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पास मंजुरी दिली आणि हा प्रकल्प कार्यान्वयनासाठी महारेलकडे हस्तांतरीत करण्यात आला. तेव्हापासून खऱ्या अर्थाने नाशिककर आणि पुणेकरांना या हायस्पीड रेल्वेमार्गाची प्रतीक्षा आहे. पहिल्या भाजप-शिवसेना युतीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन हा प्रकल्प मंजूर करून घेतला. प्रकल्पाच्या मंजुरीनंतर या महामार्गाच्या सर्वेक्षणाचे काम तातडीने हाती घेण्यात आले. सर्वेक्षणासोबतच नाशिक-अहमदनगर-पुणे दरम्यान २३५ किमी अंतराचा रेल्वेमार्ग बनविण्याचा आराखडा तयार करण्यात आला.

# नो पेन्शन - नो व्होट






आर्थिक बोजा शासनावर पडत असल्याने जुनी पेन्शन देता येणार नाही... जुन्या पेन्शनची रेल्वे पुढे गेल्याची विधानं यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती; पण असं ते म्हणाले म्हणून जुनी पेन्शन योजना सुरू करावी यासाठी राज्यातील शिक्षक व सर्व सरकारी कर्मचारी ताकतीने लढत असलेला लढा थांबला नाही, तर तो अधिक तीव्र झाला. एकंदर मुद्द्याचं गांभीर्य पाहता जुनी पेन्शन देण्याची धमक केवळ आमच्यात असल्याचं निवडणुकीदरम्यान विधान करत फडणवीस यांनी आपली भूमिका बदलत प्रश्नाबाबत सकारात्मक असल्याचं दाखवण्याचा प्रयत्न केला.

राजस्थान, छत्तीसगड, पंजाब, झारखंड व हिमाचल प्रदेश या भाजपेतर राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेत जुनी पेन्शन योजना लागू करता येऊ शकते हे दाखवून दिलं आहे. राहिला प्रश्न राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा, तर ज्या पाच राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली, त्या सर्वांपेक्षा महाराष्ट्राचं उत्पन्न अधिक आहे. त्यामुळे आर्थिक उत्पन्न हा विषय नसून इच्छाशक्ती महत्त्वाची असल्याची भावना सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये बळावत आहे. काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात सत्ता आल्यास जुनी पेन्शन योजना लागू करणार, अशी भूमिका घेतली आहे. राहुल गांधी, प्रियांका गांधी यांनी देशपातळीवर हा मुद्दा उचलला आहे. यातच सरकारी कर्मचाऱ्यांनी 'नो पेन्शन, नो व्होट' ही भूमिका घेत विधान परिषद निवडणुकीत जुनी पेन्शन हा निवडणुकीचा मुद्दा ठरवला. राज्यात १७ लाख सरकारी कर्मचारी विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. नागपूर व अमरावती येथील विद्यमान जागा सत्ता असून भाजपला बालेकिल्ल्यात गमवाव्या लागल्या आहेत. भविष्यात विधान परिषदेच्या निवडणुकांचं लोण विधानसभा व लोकसभेपर्यंत पोहोचलं तर आश्चर्य नाही. राज्यातील राजकीय परिस्थिती पाहता येणाऱ्या निवडणुकीत जुनी पेन्शन हा मुद्दा पुन्हा निर्णायक ठरू शकतो. महाविकास आघाडी जुनी पेन्शन योजनेचा मुद्दा जाहीरनाम्यात घेण्याची तयारी करत आहे. लोकशाहीत लोकमताने सरकार बदलू शकतं तसं सरकारचं मतही बदलू शकतं. त्याचप्रमाणे जुनी पेन्शन योजना सुरू करण्याबाबत निर्णय होईल? सरकारी कर्मचारी मागत असलेली जुनी पेन्शनची मागणी योग्य आहे का? असेल तर ती कशी?गेल्या पाच ते सहा वर्षांत राज्य सरकारी कर्मचारी जुनी पेन्शन योजना लागू करा ही मागणी 'एकच मिशन, जुनी पेन्शन'ची टोपी घालून आक्रमकपणे करत आहेत. यासाठी विविध स्तरांवर आंदोलनं सुरू आहेत. जुनी पेन्शन योजना म्हणजे १९८२ ची नागरी पेन्शन योजना. ही जुनी योजना केंद्र सरकारने बंद करत १ जानेवारी २००४ पासून सेवेत येणाऱ्या केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS)अमलात आणली. केंद्राचं अनुकरण करत राज्यांनी पुढे तशीच योजना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू करण्याचे निर्णय घेतले. महाराष्ट्रात तत्कालीन सरकारने १ नोव्हेंबर २००५ पासून सेवेत आलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन योजना लागू केली. नवीन पेन्शन योजना आणताना पेन्शन योजनेचं ध्येय याबाबत सर्वोच्च न्यायालयाने डी. एस. नकारा विरुद्ध भारत सरकार याप्रकरणी दिलेल्या निवाड्यात दिलेले खालील अभिप्राय पहाणं महत्वाचं आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांना दिलं जाणारं निवृत्तिवेतन बक्षीस किंवा दानशूरता म्हणून मालक देत नाही, उलटपक्षी निवृत्तिवेतन हा कर्मचाऱ्याचा हक्क आहे. निवृत्तिवेतन ही अनुग्रहपूर्वक दिलेली रक्कम नसून केलेल्या सेवेबद्दलचं प्रदान आहे. सामाजिक सुरक्षितता म्हणून कर्मचाऱ्याने वृद्धावस्थेत सन्मानाने व योग्यरीत्या आयुष्य व्यतीत करावं या उद्देशाने निवृत्तिवेतन दिलं जातं. सर्वोच्च न्यायालयाची भूमिका पाहिली व सध्या सरकारी कर्मचाऱ्यांचा आक्रोश पहिला, तर नवीन आणलेली अंशदान निवृत्तिवेतन योजना वरील ध्येय गाठण्यात १२ वर्षांनी यशस्वी होताना दिसत आहे काय, हा मोठा प्रश्न आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्प भारतीय गरिबांना सर्वोत्तम आरोग्यसेवा देऊ शकेल?

**केवळ आरोग्यविम्याच्या योजना नव्हे, तर गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रत्येक नागरिकाला मिळतील, यासाठी केंद्र सरकारने खर्च वाढवला पाहिजे...**

शासकीय रुग्णालयांच्या बाहेर मोठी रांग असते. अनेकांना योग्य उपचार न मिळवता आल्याने नाहक जीवही गमवावा लागतो. इंडियन इन्स्टिट्यूट मेडिकल सायन्सेस या संस्थेत कार्यरत असताना महाराष्ट्रातील अनेक रुग्णालयांची विदारक अवस्था डोळ्याने अनुभवली. मुंबई-पुणे- नागपूर सारख्या मोठ्या शहरांत दवाखाने तुडुंब भरलेले दिसतात. मेळघाट-गडचिरोली सारख्या ग्रामीण भागात रिक्त वैद्यकीय जागांमुळे उपचारासाठी करावा लागणारा संघर्ष मन सुन्न करून टाकतो. गरीब व मध्यमवर्गीय घटकांना परवडेल अशी दर्जेदार आरोग्य व्यवस्था भारतात उभी राहू शकेल का? नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पातील आरोग्य विषयक तरतुदी आणि भारताची जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक



तत्त्वांनुसार 'युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज' म्हणजेच प्रत्येकाला परवडेल अशी दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याबाबतची अपेक्षित वाटचाल याचा गांभीर्याने विचार गरजेचा आहे.प्रत्येक देशाचा 'युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज' साध्य करण्याचा मार्ग वेगळा असतो (भारतात सध्या आरोग्य विम्यावर भर दिसतो). प्रत्येक देशाच्या आपापल्या वेगवेगळ्या समस्या आहेत, याचा विचार करून प्रत्येक देश आपल्या अर्थसंकल्पाचे नियोजन करत असतो. भारत किंवा तत्सम विकसित देशांना 'युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज' साध्य करायचे असेल तर प्रथमत: सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट कराव्या लागतील. भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आरोग्य सेवांवरील खर्च न परवडल्यामुळे दारिद्र्यरेषेखाली ढकलली जात आहे. याचे प्रमाण कोविड-१९ नंतर दुपटीने वाढले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रावर एकूण जीडीपीच्या साधारण ३ टक्के खर्च करण्यात आला आहे. 'जगण्याच्या मूलभूत अधिकारा'चा भाग म्हणून, परवडतील अशा दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणे तितकेच महत्त्वाचे आहे. जगातील विकसित देशांचा विचार केल्यास ब्रिटन ८ टक्के, अमेरिका १६ टक्के जीडीपीच्या खर्चाच्या प्रमाणात खर्च आरोग्य व्यवस्थेवर करतात. अनेक अभ्यासकांच्या मते भारत व तत्सम विकसनशील देशांनी आरोग्य व्यवस्थेवर जीडीपीच्या किमान किमान ६ टक्के खर्च करणे गरजेचे आहे.

ब्रिटनला जागतिक आरोग्य धोरणाचा अभ्यास करताना मला येथील 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस' (एनएसएस) ही 'एक खिडकी आरोग्य व्यवस्था' अभिनव वाटली. या पद्धतीमुळे एकदा ब्रिटनचे राष्ट्रीय विमा कवच घेतल्यास जात, धर्म, आर्थिक मतभेद आदींचा विचार न करता प्रत्येकाला मोफत आरोग्य सुविधा पुरवली. जे ब्रिटिश गरीब नागरिक राष्ट्रीय विम्याची रक्कम भरण्यास असमर्थ आहेत, त्यांच्या विम्याची रक्कम सरकार भरते.

भारतात ही व्यवस्था उभी करण्यासाठी, 'युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज'ची मानके समजून घेतली पाहिजेत. ही मानके साधारणत: दोन मुख्य बाबी अधोरेखित करतात : (१) प्रत्येक देशातील सरकारने नागरिकांना आवश्यक असलेल्या गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध केल्या पाहिजेत आणि (२) प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आवश्यक उपचार, आरोग्य पुनर्वसन आणि पॅलेटिव्ह केअर म्हणजेच उपशामक काळजी या सर्व प्रकारच्या सेवा संपूर्ण स्वरूपात आणि समानतेने सर्वांना सहज उपलब्ध असाव्यात.

भारतात यासाठी आवश्यक साधनसंपत्तीसह अधिकाधिक लोकांच्या आरोग्य गरजांची प्रतिपूर्ती करू शकेल असे प्रभावी धोरण नसणे, हे दुर्दैवीच म्हणावे लागेल.भारतीय संविधानातील कलम २१ नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला जगण्याचा मूलभूत अधिकार आहे.कोविड-१९ महामारीतून आर्थिक स्थिती पुन्हा सावरत आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दिलीप भोईर यांचा शेकापला अखेरचा लाल सलाम

## चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश

। मुंबई। महाईन्यूज ।

**रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आणि मापगाव विभागातील शेकापचे खंदे कार्यकर्ते दिलीप भोईर यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मंगळवारी मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.**



यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण , आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी उपस्थित होते.मागील २ वर्षांपासून दिलीप भोईर शेकापमध्ये नाराज होते. शेकाप नेत्यांशी त्यांचे सुर जुळत नव्हते. त्यांचे अनेकदा खटके उडत होते. अखेर ते पक्ष संघटनेपासून दूर राहिले. त्यामुळे ते पक्ष सोडतील अशी अटकळ बांधली जात होती. काही महिन्यांपूर्वी ते शिवसेनेत प्रवेश करतील अशीही चर्चा होती मात्र सेनेतील फुटीमुळे ही चर्चा मागे पडली. महिनाभरापूर्वी ते भाजप नेतृत्वाच्या संपर्कात आले. आणि त्यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला. शेकापला अखेरचा लाल सलाम करत आज ते भाजपमध्ये दाखल झाले. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे अलिबाग तालुक्यात कमजोर असलेल्या भाजपला मोठे बळ मिळाले आहे. तर खिळखिळा होत चाललेल्या शेकापला मोठा धक्का बसला आहे.

> “शेकाप आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मी गेली काही वर्षे अलिबाग तालुक्याच्या विकासासाठी कार्यरत होतो. परंतु अलीकडच्या काळात पक्ष नेतृत्वाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे विकास कामात अडथळा येत होता. अशा परिस्थितीत काम करताना माझ्यासारख्या कार्यकर्त्यांची कुचंबणा होत होती. भाजप हा राष्ट्रीय पक्ष आहे आणि देशात, राज्यात सत्तेत आहे. अलिबागच्या ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी आम्ही राष्ट्रीय प्रवाहात सामील झालो आहोत.
>
> – दिलीप भोईर

दिलीप भोईर हे गेली २५ वर्षे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. २००७ साली झिराड ग्रामपंचायतीचे अपक्ष सदस्य म्हणून निवडून आले. पुढे त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर ते शेकापक्षात डेरेदाखल झाले. २०१२ व २०१७ मध्ये ते मापगाव जिल्हा परिषद मतदार संघातून निवडून आले. रायगड जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्या काळात त्यांनी चांगले काम केले. कोरोना काळात गोरगरिबांना मदत आणि लसीकरण मोहीम यामुळे ते चांगलेच चर्चेत राहिले. साई क्रीडा मंडळाच्या माध्यमातून त्यांचे विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच क्रीडाविषयक उपक्रम वर्षभर सुरू असतात.

# वरळीत गल्लीगल्लीत फिरा पण विजय आपलाच होणार!

## आदित्य ठाकरेंचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल

।नाशिक । महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ( ७ फेब्रवारी ) वरळीत सभा घेतली. यावरून युवासेना प्रमुख, आमदार आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल केला आहे. कितीही नेते येऊदे वरळीतील गल्लीगल्लीत फिरायला लावणार, तरी विजय आपलाच होणार, असा विश्वास आदित्य ठाकरेंनी व्यक्त केला.**



### महाराष्ट्राचा सुवर्णकाळ हरवला

“दुःख याचं नाही की उद्योग बाहेर गेले; मात्र राजकीय अस्थिरत्यामुळे रोजगार येत नाहीत. कधीही एवढं घाणेरडं राजकारण महाराष्ट्रात नव्हतं. माझ्याकडे देण्यासारखं काही नाही मी तुमच्याकडून घ्यायला आलेलो आहे. सध्या राज्यात गलिच्छ राजकारण सुरू आहे. हे राजकारण बदलायचं आहे. जेव्हा तुम्ही मला भेटता बोलता, तेव्हा वाटतं की महाराष्ट्राला सुवर्णकाळ येईल; पण महाराष्ट्राचा सुवर्णकाळ हरवला आहे,” असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं.

आदित्य ठाकरेंच्या संवाद यात्रेचा आज दुसरा दिवस आहे. नाशिकच्या चांदोरी येथे आयोजित सभेत ते बोलत होते. “पाठीवर वार करुन विरोधी पक्षात बसवण्यात आलं. वरळीतून लढणं जमत नव्हतं, तर मला फोन करुन सांगायचं, मी ठाण्यात येऊन लढलो असतो,” असा टोला आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला.“मला मोठ्या सभा घ्यायच्या नाहीत, मला अशाच छोट्या सभा घ्यायच्या आहेत. मोठ्या सभा घेतल्या तर नागरिकांमध्ये जाता येत नाही. गद्दार आणि मुख्यमंत्री सभा घेतात, तेव्हा खोके वाटले जातात. पण, तरीही खुर्च्या रिकाम्या असतात,” असं आदित्य ठाकरेंनी सांगितलं.

“दुःख याचं नाही की उद्योग बाहेर गेले; मात्र राजकीय अस्थिरत्यामुळे रोजगार येत नाहीत. कधीही एवढं घाणेरडं राजकारण महाराष्ट्रात नव्हतं. माझ्याकडे देण्यासारखं काही नाही मी तुमच्याकडून घ्यायला आलेलो आहे. सध्या राज्यात गलिच्छ राजकारण सुरू आहे. हे राजकारण बदलायचं आहे. जेव्हा तुम्ही मला भेटता बोलता, तेव्हा वाटतं की महाराष्ट्राला सुवर्णकाळ येईल; पण महाराष्ट्राचा सुवर्णकाळ हरवला आहे,” असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं

# काँग्रेसमध्ये मोठा भूकंप; थोरातांचा राजीनामा!

।नाशिक ।महाईन्यूज ।

नाशिक पदवीधरमध्ये सत्यजित तांबेंच्या उमेदवारीवरून प्रदेश काँग्रेसच्या दोन बड्या नेत्यांमधील वाद चव्हाट्यावर आलाय. सत्यजित तांबेंच्या वतीनं आता त्यांचे मामा बाळासाहेब थोरात दंड थोपटून मैदानात उतरलेत.



नाना पटोले यांच्या विरोधातली नाराजी त्यांनी बोलून दाखवली. दरम्यान, बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेत्याचा राजीनामा दिला आहे.गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसमधील अंतर्गत खदखद दिसून येऊ लागली आहे. अशातच नाशिक पदवीधर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जे काही घडलं त्यानंतर काँग्रेसमध्ये नेत्याची नाराजी बाहेर दिसू लागली आहे.नाशिक पदवीधर मतदारसंघातून निवडून आल्यानंतर अपक्ष आमदार सत्यजित तांबे यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीवेळी पक्षाने दिलेल्या चुकीच्या एबी फॉर्मवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर टीका केली होती.

याशिवाय बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना पत्र पाठवून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासोबत काम करणे अशक्य असल्याचेही स्पष्ट केले आहे. त्यांच्या या पत्रानंतर पक्षासह राजकीय वर्तुळात चर्चेला उत आला.

### काँग्रेसमध्ये नेत्याची नाराजी

**नाना पटोले यांच्या विरोधातली नाराजी त्यांनी बोलून दाखवली. दरम्यान, बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेत्याचा राजीनामा दिला आहे.गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसमधील अंतर्गत खदखद दिसून येऊ लागली आहे. अशातच नाशिक पदवीधर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जे काही घडलं त्यानंतर काँग्रेसमध्ये नेत्याची नाराजी बाहेर दिसू लागली आहे.**

# जुनी पेन्शन योजना पाच राज्यांत पूर्ववत!

## अर्थराज्यमंत्र्यांची संसदेत मोठी घोषणा

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**जुन्या पेन्शन योजनेसाठी देशभरातून मागणी केली जात आहे. महाराष्ट्रातही ही योजना पूर्ववत करण्यासाठी निदर्शने केली जात आहेत. त्याचपार्श्वभूमीवर लोकसभेत आज राज्यमंत्र्यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यानुसार देशातील काही राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना पूर्ववत करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.**

अर्थ राज्यमंत्री भागवत कराड म्हणाले की, देशातील सुमारे ५ राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना पूर्ववत करण्यात आली आहे. राजस्थान, छत्तीसगड, झारखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांचा त्यात समावेश आहे. तसंच, जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत राज्य सरकारांनी केंद्राला कळवले आहे. स्टेट फायनॅन्स- ए स्टडी ऑफ बजेट ऑफ २०२२-२३' या आरबीआयच्या अहवालानुसार, आर्थिक संसाधनांमधील वार्षिक बचत ही अल्पकालीन आहे. या राज्यांना पुढील वर्षांमध्ये निवृत्त पेन्शन दायित्वांचा धोका आहे, असंही भागवत कराड म्हणाले.

राजस्थान, छत्तीसगड, झारखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्य सरकारांनीही पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी (PFRDA) ला जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कळवले आहे, असं संसदेत एका प्रश्नाला उत्तर देताना अर्थ राज्यमंत्र्यांनी सांगितलं.

आरबीआयने नुकतेच सांगितले होते की, जुनी पेन्शन योजना लागू



करणाऱ्या सर्व राज्यांना आगामी काळात आर्थिक नियोजनाचा धोका निर्माण होऊ शकतो. महामारीपासून राज्यांच्या आर्थिक स्थितीत बरेच बदल झाले आहेत, त्यामुळे येणारा काळ खूप चिंताजनक असू शकतो. या कारणास्तव RBI ने OPS लागू करणाऱ्या राज्यांसाठी ही चिंतेची बाब असल्याचं म्हटले आहे.

# दिल्ली : महापौर निवडीसाठीची तिसरी सभाही निष्फळ

## 'आप' सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार



।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

दिल्लीच्या महापौर, उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी तिसऱ्यांदा आयोजित केलेली सोमवारची सर्वसाधारण सभाही गदारोळामुळे तहकूब करावी लागली. आता निवडणुकीसाठी आम आदमी पक्षाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरवले आहे. 'आप'च्या नेत्या अतिशी यांनी सोमवारी सांगितले की, महापौरपदाची निवडणूक न्यायालयाच्या देखरेखीखाली होण्यासाठी पक्ष सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे.

महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशित सदस्यांना मतदान करू देण्यावरून सोमवारी दिल्ली महापालिका सभागृहात गदारोळ झाला. त्यामुळे पीठासीन अधिकाऱ्याने पुढील तारखेपर्यंत कामकाज तहकूब केली. त्यामुळे महापौरपदाची निवडणूक होऊ शकली नाही. दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासाच्या विलंबानंतर सोमवारी सकाळी साडेअकराला सुरू झाले. त्यानंतर लगेचच महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती सदस्यांच्या निवडणुका एकाच वेळी होणार असल्याचे शर्मा यांनी जाहीर केले. या घोषणेनंतर 'आप'च्या नगरसेवकांनी विरोध सुरू केला.

### सभेआधीच आरोप-प्रत्यारोप!

**» महापौरपदाची निवडणूक रोखण्यासाठी भाजपने आपल्या नगरसेवकांना गत वेळेप्रमाणे गोंधळ घालण्याच्या सूचना दिल्या असल्याचा आरोप दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी सोमवारी दिल्ली महापालिकेचा सभेआधीच केला. भाजपचे दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी प्रत्युत्तर देताना सांगितले की, 'आप'नेच आपल्या नगरसेवकांना तशा सूचना दिल्या आहेत.**



# सरकारची मोठी घोषणा! रेल्वे, बसनंतर आता विमानातून ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास

।मध्य प्रदेश। महाईन्यूज ।




रेल्वे, बस प्रवासातदेखील ज्येष्ठ नागरिकांना विविध प्रकरची सूट दिली जाते. मात्र, आता ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे, बसनंतर थेट विमानातून प्रवास करता येणार आहे. तोदेखील मोफत.

विश्वास बसत नाहीये ना? मात्र ही बातमी तंतोतंत खरी आहे. याबाबतची घोषणा स्वतः मुख्यमंत्र्यांनी केली आहे. भिंड येथील संत रविदास यांच्या जयंती आणि चंबळ विभागाच्या विकास यात्रेच्या शुभारंभप्रसंगी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी ही घोषणा केली आहे.

चौहान म्हणाले की, राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना पुढील महिन्यापासून विमानाने तीर्थयात्रेला जाण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

या तीर्थक्षेत्र योजनेत संत रविदासांच्या जन्मस्थानासह अनेक ठिकाणांचा समावेश करण्यात आला आहे. या तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत 60 वर्षांपेक्षा जास्त वयाचे ज्येष्ठ नागरिक सरकारी खर्चाने तीर्थक्षेत्री जाऊ शकणार आहेत.


# पत्रकाराच्या मृत्यूचं प्रकरण नरेंद्र मोदींपर्यंत जाणार; ठाकरे गट आक्रमक

**नवी दिल्लीः** काल राजापूर येथे थार आणि दुचाकी अपघात होऊन त्यात पत्रकार शशिकांत वारीसे हे गंभीर जखमी झाले. आज सकाळी त्यांचा मृत्यू झाला. हे प्रकरण आता संसदेच्या अधिवेशनामध्ये गाजणार असल्याचं दिसतंय. यासंदर्भात ठाकरे गट आक्रमक झाला आहे.

याप्रकरणी थार चालक पंढरीनाथ आंबेरकर यांच्यावर राजापूर पोलीस स्थानकात ३०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताची दुसरी बाजू समोर आल्यानंतर अपघातात मृत झालेल्या शशिकांत वारीसे यांच्या नातेवाईकांनी घातपाताचा आरोप केला आहे. ठाकरे गटाचे नेते खासदार विनायक राऊत म्हणाले की, नाणार संदर्भात लिखान करणाऱ्या पत्रकाराचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. चालक पंढरीनाथ आंबेरकर हे रिफायनरी समर्थक होते, त्यामुळे हा घातपात असल्याचा संशय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून चौकशीची मागणी करणार असल्याचं राऊत म्हणाले.

यासह अधिवेशनामध्ये शशिकांत वारीसे यांच्या मृत्यूप्रकरणी आवाज उठवणार असल्याचंही विनायक राऊत म्हणाले.काल सकाळी ८ वा. ३ मिनिटांनी पत्रकार शशिकांत वारीसे यांनी रिफायनरी ग्रुपमध्ये एका बातमीची पोस्ट केली होती. "मोदीजी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या बॅनरवर गंभीर गुन्ह्यातील आरोपींचे फोटो" अशा आशयाची ती बातमी होती.

# नोरा फतेहीने समुद्राच्या मधोमध केला वाढदिवस साजरा



बॉलीवूडची प्रसिद्ध डान्सर नोरा फतेही जेव्हा कंबर हलवते तेव्हा तिच्या डान्सच्या तालावर अनेक जणांचं हृदये धडधडू लागतं. अलीकडेच नोराने तिचा वाढदिवस साजरा केला, जिथे ती बोटीवर नाचताना दिसत आहे. ही अभिनेत्री तिच्या बेली डान्स मूव्ह्सने लाखो लोकांचे मन घायाळ करते. नोराने तिच्या मित्रांसोबत खूप मस्ती केली, ज्याचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये नोरा मित्रांसोबत बोटीवर एन्जॉय करताना दिसत आहे. नोरा फतेहीने तिचा 31 वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यान अभिनेत्री तिच्या गर्ल गँगसोबत दुबईतील यॉटवर मस्ती करताना दिसली. नोराने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये ती कलरफुल फ्लॉवर प्रिंट स्कर्ट आणि टॉप घातलेली दिसत आहे. नोरा तिच्या यॉटवर उभी राहते आणि अरबी डान्स करू लागते. नोरा अतिशय सुंदर डान्स करत आहे.



# जॉनी लिव्हर यांची होती सर्वात मोठी 'ट्रॅजेडी'



पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये प्रसिद्ध विनोदी अभिनेते जॉनी लिव्हर यांनी जे विचार व्यक्त केले त्याची आता सोशल मीडियावर चर्चा होऊ लागली आहे. एरवी पडद्यावर आपल्याला खळखळून हसविणारे जॉनी लिव्हर चित्रपट माध्यमाकडे किती गांभीर्याने पाहतात हे त्यांच्या त्या भाषणावरुन दिसून आले आहे. पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या पुणे आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाअंतर्गत लिव्हर यांनी 'ह्युमर इन सिनेमा' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. सेनापती बापट रस्त्यावरील पॅव्हेलियन मॉलमधील पीव्हीआर आयकॉन या ठिकाणी सदर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी पुणे फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष आणि महोत्वाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, महोत्सवाच्या चित्रपट निवड समितीचे अध्यक्ष समर नखाते उपस्थित होते. कार्यक्रमात यांनी डॉ. पटेल यांनी जॉनी लिव्हर यांच्याशी संवाद साधला. जॉनी यांनी आपल्या नेहमीच्या विनोदी शैलीत सर्व प्रश्नांना तितक्याच दिलखुलासपणे उत्तरं दिली. ते म्हणाले, "सध्या लोकांचा 'सेन्स ऑफ ह्युमर' अर्थात विनोद बुद्धी खूप वाढली आहे. टाळेबंदीच्या काळानंतर युट्यूब, टीकटॉक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मिडिया व्यासपीठांवर अगदी थोडक्यात आणि अधिक विनोदी कंटेंट लोकांना पाहायला मिळत आहे. त्यामुळे आजच्या काळात कॉमेडी लिहणे हे लेखकांसमोरील एक मोठे आव्हान ठरत आहे. हल्ली लोकांना छोट्या मोठ्या गोष्टी सांगून हसवले जाऊ शकत नाही. त्यामुळे चित्रपटासाठी विनोदी संहिता लिहिताना अतिशय विचारपूर्वक लेखन करावे लागते," असे मत प्रसिद्ध विनोदी अभिनेते जॉनी लिव्हर यांनी मांडले.

# शिव ठाकरेचं नशीब चमकलं, सलमान खानच्या चित्रपटात झळकणार



भारतातील सर्वात मोठा रिॲलिटी टीव्ही शो बिग बॉसने अनेक स्पर्धकांचे नशीब उजळले आहे. शिव ठाकरेच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. शिव बॉलीवूड सुपरस्टार सलमान खानच्या आगामी चित्रपटात दिसणार आहे. खरं तर, सध्या शिव ठाकरे बिग बॉस 16 मध्ये खूप चर्चेत आहेत. 'बिग बॉस 16'च्या नुकत्याच पार पडलेल्या एका भागात शिव ठाकरे आणि प्रियंका चाहर चौधरीने पती-पत्नी म्हणून एक नाटक केलं. या नाटकाचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आता शिव ठाकरेच्या संबंधित नवनवीन बातम्या समोर येत आहेत. खरं तर, एका मीडिया रिपोर्टनुसार, शिव ठाकरेच्या हातात सलमान खानचा चित्रपट आहे. या चित्रपटात शिव ठाकरेही एका खास भूमिकेत दिसणार आहेत. मात्र अद्याप त्याबाबत अधिक माहिती समोर आलेली नाही. मात्र शिव ठाकरेंच्या चाहत्यांसाठी ही बातमी चांगलीच आहे.शिव ठाकरे व्यतिरिक्त, प्रियंका चाहर चौधरीबद्दल देखील अपडेट्स आले होते की प्रियंका देखील एका मोठ्या चित्रपटाचा भाग असेल. प्रियंका शाहरुख खानच्या डंकी या चित्रपटात दिसणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, याबाबतची माहिती सध्यातरी समोर आलेली नाही.



# हिंदी कार्यक्रम करण्यावरुन ट्रोल होणाऱ्या सोनाली कुलकर्णीने सुनावले खडे बोल



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून सोनाली कुलकर्णीला ओळखले जाते. ती कायमच विविध कारणांमुळे चर्चेत असते. सध्या सोनाली ही 'महाराष्ट्र ऑन माय लिप्स' या एका कार्यक्रमात झळकताना दिसत आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळ आणि त्यांची वैशिष्ट दाखवली जात आहे. मात्र हा कार्यक्रम हिंदीत असल्याने एका नेटकऱ्याने तिला ट्रोल केले आहे. त्यावर सोनालीही सडेतोड उत्तर दिले. सोनाली कुलकर्णीच्या 'महाराष्ट्र ऑन माय लिप्स' या कार्यक्रमाचा पहिला भाग नुकताच प्रदर्शित झाला. याचा एक युट्यूब व्हिडीओ तिने तिच्या ट्रीटरवर शेअर केला आहे. यात ती कोल्हापुरातील काही खास वैशिष्ट्य दाखवताना दिसत आहे. "कोल्हापूरात आम्ही आमचा संस्मरणीय प्रवास सुरू करतो. खऱ्या अर्थाने आई अंबाबाईची कृपा लाभलेले हे शहर संस्कृती,परंपरा,कलेचे माहेरघर आहे. लवंगी मिरचीच्या मसाल्यापासून ते गुळाचा गोडवा,योद्ध्यांच्या धाडसापासून ते कारागिरांच्या कौशल्यापर्यंत हे शहर सर्व पुरवते. आमच्या प्रवासात सामील व्हा", असे तिने या व्हिडीओला दिलेल्या कॅप्शनमध्ये म्हटले आहे. सोनाली कुलकर्णीच्या या व्हिडीओला एका नेटकऱ्याने रिट्वीट केले आहे. त्यात त्याने 'हिंदी का...?' असा प्रश्न विचारला आहे. त्यावर सोनालीने "कारण हा कार्यक्रम हिंदी आणि ENGLISH NEWS CHANNELS साठी आहे", असे म्हटले आहे. सोनालीच्या या उत्तरावर पुन्हा त्या नेटकऱ्याने तिला एक प्रश्न विचारला आहे. "दुःखद आहे आम्ही मराठी जपण्यासाठी काय काय उपद्रव करतो ताई आणि आपण.. हिंदी आणि इंग्रजी वाल्यांनी कधी मराठी भाषेमध्ये काही केले आहे का आज पर्यंत ??" असे तो नेटकरी म्हणाला आहे. त्याच्या या प्रश्नावर सोनालीने कपाळावर हात मारल्याचा इमोजी शेअर केला आहे. त्याबरोबर त्याला सडेतोड भाषेत उत्तरही दिलं आहे. "दुःखद हे आहे... की, तुम्हाला हे कळत नाहीये की महाराष्ट्राला देशभर आणि जगभर पोहचविण्यासाठी, आपली कला, संस्कृति, खाद्य-संस्कृति, पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र टुरिझमने हा जो उपक्रम राबवलाय तो तुम्हाला कौतुकास्पद, महाराष्ट्राच्या हिताचं नाही वाटत आहे", असे सोनालीने यावेळी म्हटले. त्यावर त्या नेटकऱ्याने पुन्हा एकदा कमेंट केली आहे.

# विराट शैली बदलणार!

## पहिल्याच कसोटीत कांगारूंना लोळवण्यासाठी द्रविडचा मास्टर प्लॅन

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला कसोटी सामना नागपूर येथे 9 फेब्रुवारीला होणार आहे. यासाठी भारतीय संघ कसून सराव करत असून पहिल्याच सामन्यात कांगारूंना फिरकीच्या जाळ्यात फसवण्याचा टीम इंडियाचा प्लॅन दिसतोय. नागपूरची खेळपट्टी पहिल्या दिवसापासून फिरकीला साथ देण्याची शक्यता आहे.**



दरम्यान, फिरकी खेळपट्टी ही दुधारी तलवारीसारखी आहे. कांगारूंना अडकवण्यासाठी फेकलेल्या जाळ्यात टीम इंडिया देखील अडकू शकते. याचमुळे भारताचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी एक खास रणनिती आखल्याची खबर मिळाली आहे. राहुल द्रविड यांनी टीम इंडियाची दोन खास शस्त्र रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याकडून स्वीप शॉटचा खास सराव करून घेतला.

विशेष म्हणजे रोहित शर्मा हा फिरकीविरूद्ध सर्रास स्वीप शॉटचा वापर करतो. मात्र विराट कोहली सहसा सरळ बॅटनेच फटकेबाजी करणे पसंत करतो. त्यामुळे आता ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या मालिकेत विराट कोहलीला आपल्या बॅटिंगच्या शैलीत थोडा बदल करावा लागणार आहे.

भारताविरूद्ध सेना देश अर्थात दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया हे स्वीप शॉट्सचा सढळ हाताने वापर करत असतात. भारतीय फिरकीचा मुकाबला करण्यासाठीचे हे त्यांचे अस्त्र आहे. भारत देखील काऊंटर अटॅकसाठी याच अस्त्राचा वापर करण्याची शक्यता आहे. भारतीय संघ यासाठी सूर्यकुमार यादव आणि इशान किशन यांच्यावर देखील जबाबदारी टाकू शकतो.

नागपूर कसोटीत श्रेयस अय्यर खेळणार की नाही याबाबत साशंकता आहे त्यामुळे संघ व्यवस्थापन त्याच्या जागेवर सूर्यकुमार यादवला संधी देण्याची शक्यता आहे. तर ऋषभ पंतच्या अनुपस्थिती इशान किशन आणि केएस भरत यांच्यात संघात स्थान मिळवण्यासाठी चुरस असेल.

### असा आहे राहुल द्रविडचा मास्टर प्लॅन

- राहुल द्रविडचा रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल, केएल राहुलला कांगारूंचा फिरकी मारा थोपवण्यासाठी स्वीप शॉटचा वापर करण्याचा सल्ला
- गेल्या मालिकेत ऋषभ पंतने देखील हीच रणनिती वापरली होती. द्रविड पंतची ही रणनिती इतर फलंदाजांनी देखील वापरावी अशी इच्छा आहे.
- नॅथन लियॉनने भारताविरूद्ध 22 कसोटी सामन्यात 34 च्या सरासरीने 94 विकेट्स घेतल्या आहेत.
- त्याने कसोटी क्रिकेटमध्ये 21 विकेट्सपैकी 7 विकेट्स या भारताविरूद्धच घेतल्या आहेत.


---

# ‘काळ आला होता पण...’ स्टार फुटबॉलपटूला ढिगाऱ्यातून सुखरुप बाहेर काढण्यात यश

## इमारतीच्या ढिगाऱ्यातून क्लबकडून खेळणाऱ्या दोन खेळाडूंना सुखरुप बाहेर

।तुर्कस्तान।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

तुर्कस्तानमध्ये सोमवारी झालेल्या भूकंपाने संपूर्ण जग हादरले. भूकंपामुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. हजारो लोकांना जीव गमवावा लागला. या घटनेत चेल्सी आणि न्यूकॅसलचा माजी फुटबॉलपटू ख्रिस्तियन अत्सू बेपत्ता होता. भूकंपामुळे पडलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली तो कुठेतरी गाडला गेला असावा, असा संशय लोकांमध्ये होता. अत्सू हा घानाचा खेळाडू जो तुर्कस्तानच्या हॅतेसपोर क्लबकडून खेळतो तो भूकंपानंतर बेपत्ता होता. अत्सू यांनी क्लबचे प्रवक्ते मुस्तफा ओझात यांना सांगितले की ते ज्या इमारतीत होते त्या इमारती भूकंपामुळे नष्ट झाल्या आहेत. याच इमारतीच्या ढिगाऱ्यातून क्लबकडून खेळणाऱ्या दोन खेळाडूंना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे.



### दुसऱ्या दिवशीही तुर्की हादरले

**तुर्कस्तान आणि सीरियामध्ये सध्या थंडीचा हंगाम आहे. भूकंपामुळे लोकांना घराबाहेर पडावे लागले आहे. लाखो लोक घराबाहेर पडले आहेत. भूकंपानंतर दोन्ही देशांच्या मदतीसाठी भारताने एनडीआरएफची टीमही तिथे पाठवली आहे. भारताच्या पंतप्रधानांनीही या घटनेवर शोक व्यक्त केला होता. तुर्कस्तानमध्ये आज म्हणजेच मंगळवारीही दोनदा भूकंपाचे धक्के जाणवले. मंगळवारी ५.४ आणि ५.९ तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले.**

केवळ नशीब बलवत्तर म्हणून घानाचा माजी फुटबॉलपटू ख्रिस्तियन अत्सू ढिगाऱ्याखालून सापडला. तुर्कस्तानच्या विनाशकारी भूकंपानंतर लॅसी आणि न्यूकॅसलचे माजी फॉरवर्ड ख्रिश्चन अत्सू याला ढिगाऱ्यातून वाचवण्यात यश आले आहे. घाना फुटबॉल असोसिएशनने ट्विटरवर यासंदर्भातील माहिती दिली आहे. घानाचा खेळाडू अत्सू हातायस्पोर या तुर्की क्लबकडून खेळतो.

क्लबचे प्रवक्ते मुस्तफा ओझात यांनी सांगितले की, “तो नष्ट झालेल्या इमारतीत होता. क्लबच्या दोन खेळाडूंना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले आहे. अत्सूचा ठावठिकाणा सापडत नव्हता.” परंतु घाना फुटबॉल असोसिएशनने मंगळवारी त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवर लिहिले की, “आम्हाला सकारात्मक बातमी मिळाली आहे की ख्रिस्तियन अत्सूची सुटका करण्यात आली आहे.” ख्रिस्तियन अत्सूवर सध्या उपचार सुरू आहेत, मात्र त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही. तुर्कस्तान आणि शेजारच्या सीरियाला सोमवारी झालेल्या ७.८ रिश्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपात ५,००० हून अधिक लोक ठार झाले. तर हजारो लोक जखमी झाले आहेत.

**हजारो लोकांचा मृत्यू**

माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की, सोमवारी तुर्की आणि शेजारच्या सीरियामध्ये ७.८ तीव्रतेच्या शक्तिशाली भूकंपात ४८०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तर हजारो लोक जखमी झाले आहेत.

---

# धक्कादायक! रौप्यपदक विजेत्या महिला कबड्डीपटूवर प्रशिक्षकाने केला अत्याचार

। नागपुर । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।



२७ वर्षीय महिला कबड्डीपटूने दिल्लीच्या बाबा हरिदास नगरमध्ये तिच्या प्रशिक्षकाविरुद्ध लैंगिक छळ आणि ब्लॅकमेल खंडणीचा आरोप केला आहे, आरोप आहे की ती २०१२ मध्ये मुंडकाजवळ होती. हिरणकुडना येथे कबड्डी स्पर्धेची तयारी करत होती. त्यानंतर २०१५ मध्ये तिच्या प्रशिक्षकाने तिच्या संमतीशिवाय तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

राष्ट्रीय स्तरावरील महिला कबड्डीपटूने दिल्लीत बलात्काराचा एफआयआर दाखल केला आहे. तक्रारीत महिला कबड्डीपटूने ४ फेब्रुवारी रोजी तिच्याच प्रशिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. द्वारका परिसरातील बाबा हरिदास पोलिस ठाण्यात आयपीसी ३७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी दिल्लीतील मुंडका भागातील अकादमीमध्ये प्रशिक्षक आहे. २०१५ पासून प्रशिक्षक तिच्यावर बलात्कार करत असल्याचा आरोप पीडितेने केला आहे. एवढेच नाही तर यादरम्यान त्याने पैसेही घेतले आहेत.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेचे मेडिकल अद्याप झालेले नाही, एफआयआर नोंदवून पीडित मुलगी दिल्लीबाहेर आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर पीडितेचे १६४ बयाण करण्यात येणार असून, यासाठी पोलिसांनी पीडितेशी संपर्क साधला आहे. १६४ चा जबाब नोंदवून पोलीस पुढील तपास सुरू करणार आहेत. विशेष म्हणजे महिला कबड्डीपटूंनी आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक पटकावले आहे. तसेच, प्रशिक्षक सात वर्षांपासून तिचे शारीरिक शोषण करत असल्याचा आरोप महिलेने प्रशिक्षकावर केला आहे. यावर कबड्डी असोसिएशन आणि क्रीडा मंत्रालयाची कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही.